Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १९/ २०१३** **दिनांक १८.११.२०१३**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा सोमवार दि.१८.११.२०१३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ ३७११/ २०१३, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दि.१८.११.२०१३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **श्री साईप्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेले गावरान तुप, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी पात्र निविदा उघडून निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ चे माहे ऑक्टो -१३ ते मार्च-१४ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर, चहा पावडर व कॉफी खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७२ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९.०९.२०१३ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर खरेदीकामी e-Tender दि.३०.०९.२०१३ ते दि.०९.१०.२०१३ चे दरम्यान Downloading करिता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले होते. सदर निविदेमधील मुळ निविदा Financial Bid दि.१८.१०.२०१३ रोजी उघडण्यात आले. त्यामध्ये गावरान तुपाकरिता २ निविदाधारक व चहा पावडर, कॉफी खरेदीकरिता १ निविदाधारकाने निविदा भरलेली होती. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने खरेदीकामी किमान तीन निविदाधारकांच्या निविदा असणे गरजेचे असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२०१३ चे सभेत गावरान तुप, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी फेर निविदा काढव्यात असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशील | कार्यवाही |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात निविदा जाहिरात प्रसिद्धी | दि.२६.१०.२०१३ |
| ०२. | वेबसाईटरवर e-Tender प्रसिद्ध करण्याची दिनांक व वेळ | दि.२६.१०.२०१३ दुपारी ०२.०० वा. |
| ०३. | e-Tender डाऊन लोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.०७.११.२०१३ सायं.०५.०० वा. |
| ०४. | निविदा (Technical Bid) व नमुने प्रत्यक्ष स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.०८.११.२०१३ सायं.०५.०० वा. |
| ०५. | प्राप्त नमुने तपासणीकामी अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडे पाठविणे | दि.०९.११.२०१३ |
| ०६. | निविदा (Technical Bid) उघडण्याची दिनांक | दि.१०.११.२०१३ सकाळी ११.०० वा. |
| ०७. | मुळ निविदा (Financial Bid) उघडण्याची दिनांक | अंदाजे दि.१६.११.२०१३ सकाळी ११.०० वा. |

सदर फेर निविदा प्रक्रियेमध्ये दि.०८.११.२०१३ रोजी सायं.०५.०० वा. पावेतो चार निविदाधारकांच्या निविदा व नमुने प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर,दिनांक | नमुना |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | १२५३०/०७.११.२०१३ | आहे. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| | | | (पंचामृत ब्रॅण्ड गावरान तुप) |
| ०२. | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | १२६१३/०८.११.२०१३ | आहे. (सोनाई ब्रॅण्ड गावरान तुप) |
| ०३. | मे.अंजता राज मिल्क प्रॉडक्टस, आग्रा | १२६१४/०८.११.२०१३ | आहे. (मोहक ब्रॅण्ड गावरान तुप) |
| ०४. | मे.अरिहंत सेल्स एजन्सी, इंदौर | १२६१५/०८.११.२०१३ | आहे. (अरिहंत ब्रॅण्ड गावरान तुप) |

उपरोक्त निविदेंमध्ये चारही निविदा या गावरान तुपाकरिता प्राप्त झालेल्या आहेत. चहा पावडर व कॉफी करिता एकही निविदा प्राप्त झालेली नाही. गावरान तुप खरेदीकामी प्राप्त चारही निविदाधारकांचे गावरान तुपाचे नमुने दि.०८.११.२०१३ रोजी सायं.०५.३० ते ०६.०० वा.चे दरम्यान अधिक्षक तथा प्र.प्रशासकीय अधिकारी खरेदी विभाग व अधिक्षक तथा प्र.प्रशासकीय अधिकारी प्रसादालय विभाग यांचे उपस्थित सिलबंद करुन, त्यास गोपनीय कोड नंबर देऊन दि.०९.११.२०१३ रोजी मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीकरिता पाठविण्यात आलेले आहेत. सदर कार्यवाहीचे ध्वनीक्षेपण विभागामार्फत चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच सदरची निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यामध्ये दि.१०.११.२०१३ रोजी निविदाधारकांकडून प्राप्त Technical Bid उघडणेबाबत नमुद केलेले आहे. मात्र सदर दिवशी रविवार असल्यामुळे सोमवार दि.११.११.२०१३ रोजी निविदाधारकांकडून प्राप्त Technical Bid श्री.एस.व्ही.गमे व श्री.यु.पी.गोंदकर प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थित उघडण्यात आले. सदरच्या निविदेचे टेक्नीकल बीड उघडले असता, संकेतस्थळावर खालील चार निविदाधारकांच्या निविदा मुदतीत Upload झालेले होत्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई |
| ०२. | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी |
| ०३. | मे.अंजता राज मिल्क प्रॉडक्टस, आग्रा |
| ०४. | मे.अरिहंत सेल्स एजन्सी, इंदौर |

उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेतील कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत (श्री.जेजुरकर, वरिष्ठ लेखापाल व श्री.बोरावके, संस्थान लेखापरिक्षक) करण्यात आलेली आहे. त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

सोबतच्या तक्त्यात दर्शविलेप्रमाणे सर्व चारही निविदाधारकांनी निविदेमध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. तरी उपरोक्त निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करुन मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेला गावरान तुपाचे तपासणी अहवालांचे अवलोकन करुन निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करता येईल. तसेच चहा पावडर व कॉफी खरेदीकामी एकाही निविदाधारकाची निविदा प्राप्त झालेली नाही. त्यामुळे मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांनी दि.१८.१०.२०१३ रोजी मागील मंजुर दराने मार्च-२०१४ पर्यंत चहा पावडर (प्रति क्विंटल रु.१८,५००/-) व कॉफी (प्रति क्विंटल रु.२८,५००/-) पुरविण्याची तयारी दर्शविलेली आहे, त्याबाबत त्यांनी लेखीपत्र व ई-मेल दिलेला आहे. मात्र त्यांना नोव्हेंबर-१३ अखेर चहा पावडर पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

तरी प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तुप, चहा पावडर व कॉफी खरेदीचे फेर निविदा प्रक्रियेकामी प्राप्त चारही निविदाधारकांचे निविदेतील Technical Bid मधील कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. तरी मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या गावरान तुपाचे तपासणी अहवालाचे अवलोकन करुन निविदाधारकांशी दराबाबत चर्चा वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेणेस तसेच चहा पावडर व कॉफी खरेदी करिता एकही निविदा प्राप्त झालेली नसल्यामुळे त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३०** मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडून उपरोक्त चारही नमुन्यांचा तपासणी अहवाल व दिलेले गोपनीय कोड नंबरची पाकिटे आजचे सभेत उघडण्यात आले असता त्यामध्ये चारही निविदाधारकांचे तुप खाण्यायोग्य असलेबाबत नमुद केलेले आहे.

त्यानुसार उपरोक्त चारही निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता मे.अजता राज प्रोट्रीन्स लिमीटेड, आग्रा यांनी ई-निविदेमध्ये प्रति क्विंटल रु.३३५/- मात्र असा दर नमुद केलेला होता, परंतु सदरचा दर हा क्विंटलचा नसुन किलोचा असलेबाबत त्यांनी सांगितले, त्याबाबत मे.अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा यांचेकडून लेखी पत्र घेण्यात येऊन ई-निविदेतील दर प्रति क्विंटल

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रु.३३,५००/- मात्र असा ग्राह्य धरण्यात आला. निविदाधारकांनी चर्चा/ वाटाघाटीअंती दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | ब्रॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचे दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | ३३,०७५/- | ३२,५००/- |
| २ | इंदापूर डेअरी अँण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | ३३,०७५/- | ३२,५००/- |
| ३ | अजता राज प्रोट्रीन्स लिमीटेड, आग्रा | मोहक | ३३,५००/- | **२९,९५०/-** |
| ४ | अरिहंत सेल्स एजसी, इंदौर | अरिहंत | ३३,३००/- | ३३,३००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) सन २०१३-१४ चे माहे ऑक्टो -१३ ते मार्च-१४ अखेर श्री साई प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तुप खरेदीसाठी मे. मे.अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा यांचे मोहक ब्रॅण्डचे प्रति क्विंटल रु.२९,९५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना ६००० क्विंटल गावरान तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेत यावा.**

**(२) आवश्यकता भासल्यास निविदेमधील अटी/ शर्तीस अधिन राहून पुरवठा आदेशाच्या २५% गावरान तुप मंजुर दराने मे. मे.अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा यांचेकडून खरेदी करणेत यावे.**

**(३) उपरोक्त गावरान तुप खरेदीकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(४) चहा पावडर व कॉफी खरेदीकामी एकाही निविदाधारकाचे दर आलेले नाही, त्यामुळे सध्याचे पुरवठाधारक मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांचेकडून मागील मंजुर दराने चहा पावडर प्रति क्विंटल रु.१८,५००/- व कॉफी प्रति क्विंटल रु.२८,५००/- मात्र याप्रमाणे पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत (अंदाजे मार्च-१४ अखेर) खरेदी करणेत यावे.**

**(५) नामंजुर निविदाधारकांचे बयाणा रक्कमचे डी.डी.त्यांना रजि.पोस्टाने अथवा समक्ष परत करणेत यावे, तसेच त्यांचे टेंडर फिचे डी.डी. लेखाशाखेत जमा करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांशी/ ठेकेदारांशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.९३१** **मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.८९७ अन्वये ठरलेनुसार निविदाधारकांनी दिलेल्या अंतीम सर्व्हिस चार्जची बंद पाकिटे आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

**(अ) संस्थानला <u>सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी</u> कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांनी दिलेल्या अंतिम सुधारीत दरांचा तपशिल-**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | वार्षिक उलाढाल (रुपये कोटीमध्ये) | सर्व्हीस चार्जेस दर: निविदेतील दर (टक्केवारी) | सर्व्हीस चार्जेस दर: चर्चा वाटाघाटी नंतरचे / बंद पाकीटातील दर (टक्केवारी) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | **मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस,** दिप बंग्लो चौक, पुणे- ४११ ०१६ | सध्या देय असणारे वेतनदर/ किमान वेतन दर | ३.६४ | २.५% | **०.५०%** | |
| २ | **मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,** मुंबई-४०००५६ | ---"--- | १२.५३ | १.०% | **०.२५%** | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | **मे.सी.आय.एस.ब्युरोज फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि.** अंधेरी (इ) मुंबई-४०० ०९३ | ---"--- | ११२.८५ | २.५% | **५.००%** | |
| ४ | **मे.स्वराज एन्टरप्राईजेस** गवळीनगर, भोसरी, पुणे-४११ ०३९ | ---"--- | ५.८७ | ०.३०% | **०.४०%** | |
| ५ | **मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि.,** धायरी, पुणे-४११०४१ | ---"--- | ६.२० | ०.५% | **०.०५%** | |
| ६ | **मे.ब्रिस्क फॅसिलिटीज प्रा.लि.** शिवाजी नगर, पुणे-४११ ००५ | ---"--- | ५.०० | ३% | **१.००%** | |
| ७ | **मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा. लि.,** पुणे-४११ ००७. | ---"--- | ६८.२४ | ०.५०% | **०.०१%** | |
| ८ | **मे.एलएमसी सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.** आकुर्डी, पुणे-४११०३५ | ---"--- | २२.९६ | २.००% | **५.००%** | |
| ९ | **मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड** गोरेगांव (पुर्व) मुंबई-४०००६५ | ---"--- | ३०५.२५ | ०.००% | **०.०५%** | |
| १० | **मे.ट्रिग गार्डफोर्स लिमिटेड** अंधेरी (प) मुंबई-४०० ०५३ | ---"--- | ३४.६० | २% | **०.००%** | |
| ११ | **मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,** पुणे-मुंबई रोड, चिंचवड, पुणे-४११ ०१९ | ---"--- | ५६५.८० | २.००% | **०.०१%** | |
| १२ | **मे.औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस,** सिडको, औरंगाबाद-४३१००३ | ---"--- | २२.९३ | ४.९९% | **२.७९%** | |
| १३ | **मे.ईगल आय एन्टरप्राईज,** दाबेल वापी-दमनरोड (यु.टी.) | ---"--- | ३.५० | ५.००% | **२.००%** | |

**(ब) संस्थानला <u>अकुशल व कुशल कर्मचारी</u> कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांनी दिलेल्या अंतिम दरांचा तपशिल-**

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | वार्षिक उलाढाल (रुपये कोटीमध्ये) | सर्व्हिस चार्जेस दर | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदेतील दर (टक्केवारी) | चर्चा वाटाघाटी नंतरचे/ बंद पाकीटातील दर (टक्केवारी) | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १) | **मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस,** दिप बंग्लो चौक, पुणे-४११ ०१६ | सध्या देय्य असणारे वेतनदर/किमान वेतन दर | ३.६४ | २.५% | **०.५०%** | |
| २) | **मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,** विले पार्ले(पश्चिम), मुंबई-४०००५६ | ---”--- | १२.५३ | १.०% | **०.२५%** | |
| ३) | **मे.सी.आय.एस.ब्युरोज फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि.** अंधेरी-कुर्लारोड, अंधेरी (इ) मुंबई-४०० ०९३ | ---”--- | ११२.८५ | २.५% | **५.००%** | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | वार्षिक उलाढाल (रुपये कोटीमध्ये) | सर्व्हिस चार्जेस दर | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदेतील दर (टक्केवारी) | चर्चा वाटाघाटी नंतरचे/ बंद पाकीटातील दर (टक्केवारी) | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ४) | **मे.उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर,** बाजार वॉर्ड, विरार (पुर्व), मुंबई-४०१ ३०३ | ---"--- | ३.२५ | ७% | **अनुपस्थित** | |
| ५) | **मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस अॅन्ड सिस्टम्स प्रा.लि.,** धायरी, पुणे-४११०४१ | ---"--- | ६.२० | ०.१०% | **०.०२%** | |
| ६) | **मे.ब्रिस्क फॅसिलिटीज प्रा.लि.** भांबुर्डी, शिवाजी नगर, पुणे-४११ ००५ | ---"--- | ५.०० | ३% | **१.००%** | |
| ७) | **मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,** औंध, पुणे-४११ ००७. | ---"--- | ६८.२४ | ०.५०% | **०.०१%** | |
| ८) | **मे.एलएमसी सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.** फेम मल्टीप्लेस जवळ, आकुर्डी, पुणे-४११०३५ | ---"--- | २२.९६ | २.००% | **५.००%** | |
| ९) | **मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड** आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव (पुर्व) मुंबई-४०००६५ | ---"--- | ३०५.२५ | ०.००% | **०.०५%** | |
| १०) | **मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,** पुणे-मुंबई रोड, चिंचवड, पुणे-४११ ०१९ | ---"--- | ५६५.८० | २.००% | **०.०१%** | |
| ११) | **मे.औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस,** सिडको, औरंगाबाद-४३१००३ | ---"--- | २२.९३ | ४.९९% | **२.७९%** | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ व ब तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता, श्री साईबाबा संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी तिन वर्ष कालावधीसाठी नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकरिता संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर "सिलबंद निविदा" मागविणेत याव्यात. याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सध्या संस्थानमध्ये काम असलेल्या लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांना पुढील नवीन कॉन्ट्रॅक्टर्सच्या नेमणूका होईपर्यंत सध्याचेच अटी व शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देणेत यावी व निविदाधारकांनी निविदेसोबत सादर केलेली अनामत रक्कम त्यांना त्वरीत परत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.९३२** **मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी दि.३०.०१.२०१३ रोजीचे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान, शिर्डी या देवस्थानास आंतरराष्ट्रीय दर्जाचे महत्व प्राप्त झालेले असून श्री साईबाबांच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस भाविकांच्या संख्येत वाढ होत आहे व सदर ठिकाणची सुरक्षाव्यवस्था जबाबदार सुरक्षारक्षकांकडून करुन घेणे गरजेचे झालेले आहे. श्री साईबाबा मंदिर घातपाती व्यक्तींच्या दृष्टीक्षेपात आहे व सद्यस्थितीला होत असलेल्या घातपाती घटना विचारात घेता मंदिर व मंदिर परिसराची सुरक्षा जोखमीची झालेली आहे.

मंदिर व मंदिर परिसरामध्ये खाजगी सुरक्षारक्षक नेमण्यात आलेले असून हे खाजगी सुरक्षारक्षक प्रशिक्षित नाहीत. त्यामुळे विविध अतिरेकी संघटनांकडून असलेला धोका लक्षात घेता, सदर ठिकाणच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे सुरक्षारक्षक नेमणेबाबत शिघ्रगतीने कारवाई व्हावी," असे कळविले आहे. त्याबाबत त्वरीत कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरील निर्णय क्र. ९३० ते ९३२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (अजय मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी